# पर्यावरणाविषयी डोळस विचार व्हावा

## विनायकदादा पाटील : वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन



वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा शुभारंभ रोपट्यास पाणी टाकून करताना विनायकदादा पाटील. समवेत योगेश एकबोटे, वीरेंद्र चित्राव व मंदार पाराशरे.

नाशिक : माणसांच्या गरजेपोटी पर्यावरणाचा ऱ्हास झालेला आहे. त्यामुळे आपण आपल्या गरजा कमी केल्या पाहिजे. आता पर्यावरण हीच एक गरज बनली असून, पर्यावरणाविषयी डोळस विचार होण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन वनाधिपती विनायकदादा पाटील यांनी किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना केले.

कुसुमाग्रज स्मारकात किर्लोस्कर उद्योगसमूह आणि वसुंधरा क्लब यांच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून प्रारंभ झाला. सकाळी जगदीश कुलकर्णी यांनी पर्यावरणीय चित्रपटनिर्मितीवरील कार्यशाळेत मार्गदर्शन केले. त्यानंतर सायंकाळी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना विनायकदादा पाटील यांनी सांगितले, परमेश्वराने जी पंचमहाभूते दिली आहेत ती जशीच्या तशी कायम राहण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण होय. पर्यावरण ही इतरांनी राखण्याची बाब नाही. त्याची सुरुवात स्वत:पासूनच करायला हवी. झाड हे प्रथम मनात उगवते नंतर ते शेतात उगवते. निसर्गाचे कारकच मन आहे. प्रतिष्ठेपोटीही पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे. पर्यावरणही जपले पाहिजे आणि विकासही झाला पाहिजे. पर्यावरणवाद्यांमध्ये काही अतिरेकीही असतात. रस्ता रुंदीकरणाच्या वेळी वृक्षतोडीला विरोध होतो. अशावेळी पर्यावरणवाद्यांनी संयम बाळगला पाहिजे, असा सल्लाही पाटील यांनी दिला. किर्लोस्करचे फॅक्टरी मॅनेजर मंदार पाराशरे यांनीही मनोगत व्यक्त केले. वसुंधरा क्लबचे वीरेंद्र चित्राव यांनी प्रास्ताविक, तर गौतमी देशमुख हिने सूत्रसंचालन केले. योगेश एकबोटे यांनी स्वागत केले. (प्रतिनिधी)

## ...त्या फुलांच्या गंधकोशी

### निसर्गायन : सांगीतिक मैफल बहरली

नाशिक : 'फिटे अंधाराचे जाळे', 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे', 'त्या फुलांच्या गंधकोशी'...यासह निसर्गाच्या वैविध्यतेचे गुणगान गाणाऱ्या अनेक कविता आणि गीतांची मैफल बहरली आणि रसिकांनी तजेलदार गारवा अनुभवत मैफलीला उत्स्फूर्त दाद दिली.

कुसुमाग्रज स्मारकात किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवात 'निसर्गायन' या मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. नाशिकचे गायक विवेक केळकर, आनंद अत्रे, मीना निकम आणि चिमुरडी गायिका रेवा यांनी आपल्या सुरेल आवाजात ही मैफल सजविली. दोन सत्रांत झालेल्या या मैफलीची सुरुवात विवेक केळकर यांनी 'फिटे अंधाराचे जाळे' या गीताने केली. त्यानंतर आनंद अत्रे यांनी हिरवा निसर्ग, मन उधाण वाऱ्याचे ही गीते सादर करत रसिकांमध्ये जोश निर्माण केला. मीना निकम यांनी 'चाफा बोलेना', 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे', 'या चिमण्यांनो', 'श्रावणात घननीळा' ही गीते सादर केली. या सत्राचे निवेदन राहुल सोलापूरकर व सुप्रिया चित्राव यांनी केले. दुसऱ्या सत्रात 'गारवा', 'दिला है छोटासा', 'हुस्न पहाडोंका', 'वारा गाई गाणे', 'ज्योतीकलश छलके', 'फिर छिडी रात', 'बगळ्यांची माळ फुले', 'गगन सदन तेजोमय' या गीतांनी मैफलीत रंग भरले. साथसंगत सतीश पेंडसे (तबला), अनिल धुमाळ (कीबोर्ड), स्वरांजय धुमाळ (ऑक्टोपॅड व ढोलक), विनेश नायर (तालवाद्य) यांनी केली. निवेदन किशोर पाठक यांनी केले. दरम्यान, प्रसिद्ध कवी नलेश पाटील यांनीही निसर्गविषयक कविता सादर करत उपस्थितांकडून दाद मिळविली. (प्रतिनिधी)



'निसर्गायन' मैफलीत गीत सादर करताना विवेक केळकर. समवेत मीना निकम, आनंद अत्रे, राहुल सोलापूरकर, सुप्रिया चित्राव, रेवा व वादक.